# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

**मध्यवर्ती कार्यालय, डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई ४०० ००८**

**दूरध्वनी क्र.२३०२३९००**

## पुरवणी जाहिरात

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व विभागीय कार्यालयाकडून चालक (कनिष्ठ), वाहक (कनिष्ठ), सहा.वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ), प्रमुख कारागीर (कनिष्ठ), कारागिर ''क'' (कनिष्ठ) व सहाय्यक (कनिष्ठ) या पदांच्या सरळसेवा भरतीसाठी नोव्हेंबर,२००९ च्या शेवटच्या आठवडयात जिल्हा स्तरावर स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीत दर्शविलेल्या अनुसूचित जमातीच्या पदांना अधिक प्रसिध्दी मिळावी, म्हणून राज्य व प्रादेशिक पातळीवरील वृत्तपत्रात दिनांक ५.१२.२००९ रोजी मध्यवर्ती कार्यालयामार्फत जाहिरात देण्यात आली होती. सदर जाहिरातीमध्ये खेळाडूंसाठी असलेल्या जागांचा उल्लेख केलेला नसल्यामुळे पुन्हा दिनांक १८.१२.२००९ रोजी राज्य व प्रादेशिक पातळीवरील वृत्तपत्रांत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या अर्जांच्या बाबतीत पुढील प्रक्रिया सध्या सुरु आहे.

दरम्यान भरतीची कार्यपध्दती व निवडीचे निकष यामध्ये बदल करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. पूर्वीच्या कार्यपध्दतीनुसार उमेदवाराची निवड ही शैक्षणिक पात्रतेच्या परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांवर अवलंबून होती. आता सर्वच पदांकरीता उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. भरतीची नवीन कार्यपध्दती व निवडीचे निकष सर्व संबंधितांच्या माहितीसाठी खालील तक्त्यात दर्शविण्यात आले आहेत.

| अ. क्र. | पद | वस्तुनिष्ठ लेखी परीक्षेसाठी गुण व उत्तीर्णतेसाठी किमान आवश्यक गुण | वाहन चालन चाचणी/ व्यवसाय चाचणी गुण व उत्तीर्णतेसाठी किमान आव- श्यक गुण. | मुलाखतीस बोलवावयाच्या उमेदवारांचे प्रमाण | अंतिम निवडीसाठी निकष. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | चालक (कनिष्ठ) | १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उत्तीर्णतेसाठी किमान ३५ टक्के गुण आवश्यक.<br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागास-वर्गी-यांसाठी ३० टक्के पर्यंत शिथिलक्षम. | लेखी चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून त्या त्या जाती प्रवर्गातील लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांनुसार १:५ या प्रमाणात उमेदवारांना वाहन चालन चाचणी साठी बोलाविण्यात येईल. १०० गुणांची वाहन चालन चाचणी घेण्यात येईल. उत्तीर्णतेसाठी किमान ५० गुण आवश्यक. | वाहन चालन चाचणीत उत्तीर्ण झालेल्या त्या त्या जाती प्रवर्गातील वाहन चालन चाचणीत मिळालेल्या गुणांनुसार १:३ या प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. | १)लेखी चाचणीमधील गुणांवर ४० टक्के भारांक, वाहन चालन चाचणी मधील गुणांवर ५० टक्के भारांक व मुलाखती मधील गुणांवर १० टक्के भारांक देऊन गुणानुक्रमे अंतिम निवड केली जाईल.<br>२)एम.एस.सीआयटी कोर्स पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्राधान्य. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| २<br><br>३ | वाहक (कनिष्ठ)<br><br>सहाय्यक वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ) | १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उत्तीर्णतेसाठी किमान ३५ टक्के गुण आवश्यक.<br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३० टक्के पर्यंत शिथिलक्षम. | व्यवसाय चाचणी नाही | लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या त्या त्या जाती प्रवर्गातील उमेदवारांना लेखी परीक्षेतील गुणांनुसार १:३ या प्रमाणात मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. | १) लेखी परीक्षेतील गुणांवर ९० टक्के भारांक व मुलाखती मधील गुणांवर १० टक्के भारांक देऊन गुणानुक्रमे अंतिम निवड केली जाईल.<br>२) निवड झालेल्या उमेदवाराने रा.प. महामंडळात रुजू झालेल्या तारखेपासून दोन वर्षाच्या कालावधीत एम.एस.सीआयटीचा कोर्स पूर्ण करुन दाखला सादर करणे बंधनकारक राहील. |
| ४<br><br>५ | प्रमुख कारागिर (कनिष्ठ)<br><br>कारागिर "क" (कनिष्ठ) | १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उत्तीर्णतेसाठी किमान ३५ टक्के गुण आवश्यक.<br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३० टक्के पर्यंत शिथिलक्षम. | लेखी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची १०० गुणांची अर्हताकारी व्यवसाय चाचणी घेण्यात येईल. उत्तीर्णतेकरीता उमेदवारांना किमान ३५ टक्के गुण मिळणे आवश्यक.<br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३० टक्के पर्यंत शिथिलक्षम. | अर्हताकारी व्यवसाय चाचणीत उत्तीर्ण झालेल्या त्या त्या जाती प्रवर्गातील उमेदवारांना लेखी परीक्षेतील गुणांनुसार १:३ या प्रमाणात मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. | लेखी परीक्षेतील गुणावंर ९० टक्के भारांक व मुलाखती मधील गुणांवर १० टक्के भारांक देऊन गुणानुक्रमे अंतिम निवड केली जाईल |
| ६ | सहाय्यक (कनिष्ठ) | १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उत्तीर्णतेसाठी किमान ३५ टक्के गुण आवश्यक.<br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३० टक्के पर्यंत शिथिलक्षम. | व्यवसाय चाचणी नाही | लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या त्या त्या जाती प्रवर्गातील उमेदवारांना लेखी परीक्षेतील गुणानुसार १:३ या प्रमाणात मुलाखती साठी बोलाविण्यात येईल. | लेखी परीक्षेतील गुणावंर ९० टक्के भारांक व मुलाखती मधील गुणांवर १० टक्के भारांक देऊन गुणानुक्रमे अंतिम निवड केली जाईल |

वरील प्रमाणे सर्व पदांसाठी निवड यादी तयार करताना शासनाने वेळोवेळी निर्देशीत केल्याप्रमाणे सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन, अंतीम निवड यादी तयार करण्यात येईल.

..३..

वर नमुद केल्याप्रमाणे **नोव्हेंबर / डिसेंबर २००९ मध्ये दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केले आहेत, त्यांनी पुन्हा अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही.** परंतु, नोव्हेंबर,२००९ मध्ये काही विभागांनी दिलेल्या जाहिरातीमध्ये **वाहक ,प्रमुख कारागिर,कारागिर ''क'' व सहाय्यक** या पदी यापूर्वीच्या भरतीमध्ये निवडलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (कट ऑफ मार्कस ) दर्शविण्यात आले होते. त्यामुळे गुणांची टक्केवारी कमी आहे म्हणून ज्यांनी सदर पदासाठी अर्ज केले नाहीत, केवळ अशाच उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरुन अर्ज करावेत.सदरचे अर्ज स्विकारण्याची अंतिम **तारीख २० फेब्रवारी,२०१०** ही राहील. विविध पदांसाठी पात्रतेच्या अटी, अर्ज कसा करावा याबाबतच्या सूचना, अर्ज पाठवण्याचा पत्ता व इतर सर्व बाबी वर नमुद केल्यानुसार पूर्वी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे असतील.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)